# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६०९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२३/०९/२०१६

**१) शेतातील ऑइल इंजनची चोरी . :—**

दिनांक २१+२२/०९/०१६ रात्र दर. यातील फिर्यादी मोहण खुशाल चारमोडे वय ६५ वर्ष, रा. सेलोटी याच्या शेतातील बोळीवर धानाला पाणी देण्यासाठी १ होंडा कंपनीचा ऑईल इंजन मॉडल नं. ७३५७,३ एचपी कि. ३,०००/—रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) मारोती वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन सायकल स्वारास धडक दिल्याने जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २२/०९/२०१६ रोजी ११.३० वा. दर. यातील जखमी संजय खटुजी नागरे वय ३२ वर्ष, रा. शहापुर हा आपल्या सायकलने एनएच ६ रोड ओलांडुन घरी सायकलने जात असतांना भंडारा कडुन पेट्रोलपंप ठाणा कडे जाणा—या यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन जखमीचे सायकलला मागेहुन शहापुर येथे धडक मारुन खाली पाडुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी कैलास खटुजी नागरे वय ३४ वर्ष, रा. नेहरु वार्ड शहापुर यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३८ भादंवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) जुन्या वादावरुन भांडण करुन थापड बुक्याने व दगडाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक. २२/०९/२०१६ रोजी ११.०० वा. दर. यातील फिर्यादी कैलास नरेंन्द्र बन्सोड वय २५ वर्ष, रा. शास्त्री वार्ड वरठी हा त्याचे मित्रासह मोटार सायकलने जात असता आरोपी हा त्यांना भेटला व जुने भांडणावरुन भांडण करुन फिर्यादी यास थापड बुक्याने व दगडाने डावे कानाजवळ मारुन जखमी केले असे फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३२४ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पटले पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक २२/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ९३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०४ केसेस, तिन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व ईतर वाहनांवरती ८२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.